महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.३४८/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. २८४ दिनांक ०५ / ०४ / २०१०

विषय : लाड-पागे शिफारशीवर शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार प्रलंबित प्रकरणी नोकरी व व्यवसाय परवाना देण्याबाबत अन्यथा संबंधीताविरुध्द कार्यवाही करणे बाबत.

संदर्भ : १) शासनाचे उप सचिव, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण २०१०/प्र.क्र.३८/ऊर्जा-२ दिनांक ०१.०२.२०१०.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.६३ दिनांक २५.०७.२००६.

......

महाराष्ट्र सफाई कर्मचारी आयोगाने सन १९९८-१९९९ च्या अहवालावरील शिफारशींवर कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना प्रशासकीय परिपत्रक क्र.६३ दिनांक २५.०७.२००६ अन्वये यापुर्वीच देण्यात आलेल्या आहेत. आता या संदर्भात शासनाचे उप सचिव, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या संदर्भिय दि.०१.०२.२०१० च्या पत्रासोबत प्राप्त झालेले समाज कल्याण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र.संकस/मावक/ लाडपागे/बैअ/२००९-२०१०/का-१२/२१५२ दि.१६.११.२००९ ची प्रत सोबत जोडली आहे.

२. सर्व संबंधीतानी अतिरीक्त संचालक समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दि.१६.११.२००९ च्या पत्राचे अवलोकन करावे व सदर पत्रात नमूद सूचनांची काटेकोरपणे अनुपालन करण्याबाबतची कार्यवाही करावी.

३. सदर प्रशासकीय परिपत्रक www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरील प्रमाणे.

*(सु.य.पाटील)*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रति,
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना.

*D:\O&M\Adm Cir.F.N.348.doc*

क्र. सकसं/मावक/लाडपागे/बैअ/
२००९-२०१०/का-१२/ २९५२
समाज कल्याण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१
दिनांक :- १६ नोव्हेंबर २००९

प्रति,

१. मा.प्रधान सचिव, औषधी द्रव्य संशोधन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.प्रधान सचिव, आरोग्य सेवा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा.प्रधान सचिव, परिवहन शुल्क विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४. मा.प्रधान सचिव, पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५. मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. मा.प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७. मा.प्रधान सचिव, उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८. मा.प्रधान सचिव, तंत्र शिक्षण व उच्च शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९. मा.सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०. मा.प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मावक बीसी सेल, मंत्रालय, मुंबई-३२
११. मा.प्रधान सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

१०४९/का-२

**विषय** :- लाड-पागे शिफारशीवर शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार प्रलंबित प्रकरणी नोकरी व व्यवसाय परवाना देण्याबाबत अन्यथा संबंधिताविरुध्द कार्यवाही करणेबाबत

**संदर्भ** :- संस्थापक, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष, मेहतर बाल्मिकी सामाजिक न्यायप्राप्ती संघर्ष संघटना, पुणे यांनी दिलेले दिनांक १२/१०/२००९ चे निवेदन, दिनांक २/९/२००९, दिनांक ७/९/२००९, दिनांक २९/९/२००९ व दिनांक १८/८/२००९ चे निवेदने

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात मेहतर बाल्मिकी सामाजिक न्याय प्राप्ति संघर्ष संघटनांचे निवेदनाची छायांकित प्रत सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

शासन परिपपत्रक क्र.बीसीसी-२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६-ब, दिनांक २१/४/२००६ नुसार सफाई कामागारांच्या विविध मागण्या/ प्रश्नांबाबत तसेच लाड-पागे समितीच्या शिफारशीच्या अंमलबजावणीच्या समन्वयाचे कामकाज हे सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य क्रीडा व विशेष सहाय्य विभागाकडून पाहिले जाते तसेच याबाबत या विभागाकडून वेळोवेळी बैठकांचे आयोजन केले जाते तेंव्हा सफाई कामागारांच्या विविध मागण्या/प्रश्नाबाबत त्या समितीच्या शिफारशीच्या अंमलबजावणीसंदर्भात

२०/११/०९ १९/११/०९

C:\Ga/She.lwp

काही मार्गदर्शन आवश्यक असल्यास याबाबतचा पुढील सर्व पत्रव्यवहार सामाजिक न्याय विभागाकडे करावा. असे वरील शासन परिपत्रकात नमूद केले आहे.

सबब वरील विषयासंदर्भात मेहतर बाल्मिकी सामाजिक न्याय प्राप्ति संघर्ष संघटना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या पदोन्नती/नियुक्ती/धंदा या मागण्याबाबत दिनांक ३० एप्रिल २००९ रोजी संचालक समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात बैठक आयोजित करुन अधिकारी व कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी यांचेशी चर्चा करुन त्यांच्या मागण्याबाबत संबंधित विभागाचे अधिकारी यांना त्यांच्याकडील प्रलंबित प्रकरणाबाबत नियमानुसार कार्यवाही करुन ३० दिवसांच्या आत प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत योग्य त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याबाबतचे इतिवृत्त या संचालनालयाचे पत्र क्र.५६२, दिनांक १२ मे २००९ अन्वये संबंधित विभागाला सादर करुन त्याबाबतचा अहवाल या संचालनालयास सादर करणेबाबत वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. परंतु संबंधित विभागाकडून अद्याप पर्यंत सफाई कर्मचा-यांच्या विविध मागण्या/प्रश्नांबाबत तसेच लाड-पागे शिफारीशीच्या अंमलबजावीणबाबतचा त्यांचा अहवाल आज अखेर अप्राप्त आहे. त्यामुळे वरील संदर्भिय पत्रान्वये संबंधित संघटनेने संबंधित विभागाचे अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची (अन्याय अत्याच कार्यवाही करण्याबाबत संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पत्र दिले असता त्या पत्रावर संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी "कारवाई करा" असा शेरा दिलेला आहे.

सबब लाड समिती शिफारशीवर शासनाने २८ जुलै १९८७ व पागे समिती शिफारशीवर दिनांक २१ जून १९७९ रोजी निर्णय घेतला असून सदर निर्णय कायदेशीर तरतूद (Mandutory Provision) व त्याची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. प्रस्तुत प्रकरणी पागे समिती शासन निर्णयानुसार अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश संचालक, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांना देण्यात आले आहेत. त्याच प्रमाणे सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक दिनांक २१/४/२००६ अन्वय समन्वय अधिकार या संचालनालयास दिले आहे. शासनाने प्रदान केलेल्या अधिकारान्वये प्रस्तुत प्रलंबित प्रकरणी सखोल अभ्यास करुन शासन परिपत्रक यांचा संदर्भ देवून वेळोवेळी संबंधित कार्यालयांना या कार्यालयाचा बहुमूल्य वेळ खर्च करुन निर्देश पाठविलेले असताना कनिष्ठ प्रशासन व्यवस्था व नियुक्ती अधिकारी सद् आदेशाचा अवमान करुन त्यांचे व्यक्तीगत हरकतीचे मुद्दे उपस्थित करुन (ज्याला कोणताही शासन निर्णयाचा संदर्भ नसतो) सदर प्रकरणे प्रलंबित ठेवताता ही कृती अत्यंत बेजबाबदार व गैर आहे असे दिसून आले आहे.

दिनांक ३०/४/२००९ रोजी संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, यांनी घेतलेल्या बैठकीत संघटनेने वरील सर्व सक्षम यंत्रणेचे आदेश, शासनादेशाची पुस्तिका सर्व प्रशासकीय अधिक-यांना दिली आहे. व या संचालनालयाकडून संबंधित यंत्रनेला सुध्दा वेळोवेळी मागदर्शन करण्यात आलेले आहे. असे असतांना सुध्दा सदर प्रकरणे प्रलंबित ठेवल्याचे दिसून येते.

सामान्य प्रशासन परिपत्रक दिनांक १/१०/२००३ अन्वये स्वयंस्पष्ट अंमलबजावणीचे निर्देश दिलेले असतानाही प्रशासनाची सदरची कृती शासन आदेश व तरतुदीचा अवमान व पददलित मेहतर बाल्मिकी समाजाच्या उमेदवारावर अन्याय आहे. लाड-पागे शासन निर्णय व त्यास संलग्न असणा-या तरतूदी व

शासन आदेश याबाबत वेळोवेळी संचालनालयाचे पत्राने मागदर्शन केले आहेत. त्या तरतूदीची अंमलबजावणी करणेचे योग्य ते आदेश शासनस्तरावरुन आपल्या अधिनस्त प्रशासन विभागास देण्यात यावेत. संबंधित यंत्रणेला या विभागाकडून जे मागदर्शन केले आहे. त्या मार्गदर्शनुसार मेहतर बाल्मिकी उमेदवारांच्या नियुक्तीच्या कार्यवाही व उद्योग धंद्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सूचना व मागदर्शन केलेले असताना सुध्दा सदर प्रकरणे प्रलंबित ठेवलेले असून पुन:श्च या संचालनालयाचे मागदर्शन व समन्वयांच्या सत्यतेबाबत काही शंका असल्यास सबंधित अधिका-यांनी प्रकरणात दाखल केलेली छायांकित प्रत सत्यतेची पडताळणी करणेकामी योग्य त्या अधिका-यास या संचालनलयात पाठवून त्वरीत शहानिशा करुन लाड/पागे प्रकरणी शासनादेशात नमूद तरतूदीनुसार ३० दिवसांत नियुक्ती प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत आपल्या अधिनस्त असलेल्या विभाग प्रमुखांना योग्य ते आदेश द्यावेत, ही विनंती.

आपला विश्वासू.

अतिरिक्त संचालक,
समाज कल्याण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे -१

**प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव**

१. मा.अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे
२. मा.व्यवस्थापक, पीएमपीएमएल, स्वारगेट, पुणे
३. मा.आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका,
४. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे
५. मा.कुलगुरु, पुणे विद्यापीठ, पुणे
६. जिल्हा शल्य चिकीत्सक, औंध सर्व सामान्य रुग्णालय, पुणे
७. अधिक्षक, मनोरुग्णालय, येरवडा, पुणे
८. अधिक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, बाणेर रोड, पुणे
९. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क) जिल्हा परिषद, सातारा
१०.उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, घोले रोड, पुणे-५
११.अधिक्षक, ईएसआयएएस हॉस्पिटल, मोहननगर, चिंचवड, पुणे
१२.विभागीय आयुक्त साहेब, पुणे विभाग, पुणे
१३.मा.जिल्हाधिकारी साहेब, पुणे
१४.मा.पोलीस आयुक्त साहेब, पुणे
१५. अध्यक्ष/सचिव, मेहतर बाल्मिकी न्यायप्राप्ती संघर्ष समिती, संघटना, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

महाराष्ट्र सफाई कर्मचारी आयोगाने सन १९९८-९९
च्या अहवालावरील.शिफारशीबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :बीसीसी-२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १/१०/२००३

संदर्भ :(१) सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी-१०७५/ ३४८/(ओ)११/सोळा, दिनांक १६ नोव्हेंबर,१९७६.

(२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : बीसीसी-१०७७/ १५२२/सोळा, दिनांक २९ ऑक्टोबर,१९७७.

## शासन परिपत्रक

श्री.लाड व पागे समितीने मेहतर, वाल्मिकी समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी शिफारशी केलेल्या आहेत त्या अनुषंगाने, सामान्य प्रशासन विभाग, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग व नगर विकास विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/शासन परिपत्रकाव्दारे देण्यात आलेल्या आदेशांचे/सूचनांचे शासकीय/ निमशासकीय /महानगरपालिका/नगरपालिका/नगर परिषदा/ मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/अनुदानित संस्था इत्याद्री आस्थापनेवरील कर्मचारी/अधिकारी या आदेशांची/सूचनांची अंमलबजावणी करण्याबाबत अनास्था दाखवित आहेत. ही बाब निश्चितच गंभीर स्वरुपाची असल्याने याबाबत शासनाने गंभीर दखल घेतलेली आहे.

२. महाराष्ट्र सफाई कर्मचारी आयोगाने सन १९९८-९९ च्या पहिल्या अहवालातील शिफारशींवर शासनाने विचार करुन खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

(अ) लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/महानगरपालिका/नगर परिषदा/ नगरपालिका/ खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्याच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भासल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करुन त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

(ब) शासकिय/निमशासकिय कार्यालयातील सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील ज्येष्ठता यादीतील मेहतर-वाल्मिकी, भंगी या जातीच्या उमेदवारांची त्यांच्या जातीचा विचार करुन नव्हे तर त्यांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्या आधारे त्यांची नेमणूक करण्यात येईल, यासंबंधी विशेष खबरदारी घेण्यात यावी.

(क) मेहतर म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीची अनुसूचित जातीकरिता वर्ग-४ मध्ये ज्या रिकाम्या जागा राखून ठेवलेल्या असतात त्या जागांच्या संबंधात गणना करण्यात येणार नाही. त्यांची सरळसेवेने भरती करावी. मेहेतरांच्या संख्येचा वार्षिक विवरणात दर्शविलेल्या वर्ग चारच्या आकड्यांमध्ये समावेश होणार नाही. हे आकडे वार्षिक विवरणपत्रात स्वतंत्र प्रवर्गामध्ये दर्शविण्यात आले पाहिजेत. वर्ग चार संबंधातील आकड्यांमध्ये मेहेतरांची संख्या समाविष्ट नाही अशा अर्थाची टीप वार्षिक विवरणाच्या शेवटी विनिर्देशपूर्वक समाविष्ट करण्यात आली पाहिजे.

(ड) मेहतर, वाल्मिकी समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी लाड व पागे समितीने केलेल्या शिफारशीवर समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग आणि नगर विकास विभाग यांनी वेळोवेळी शासन निर्णय/शासन परिपत्रक इत्यादी व्दारे आदेश/सूचना निर्गमित केलेल्या आहेत त्यांचे पालन सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये,तसेच मंडळे, महामंडळे यांनी ही करावी.

(ई) मेहतर, वाल्मिकी समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी शासनाने निर्गमित केलेले आदेशाचे/सूचनांची अंमलबजावणी करण्यास शासकीय/ निमशासकीय/ महानगरपालिका/नगरपालिका/स्वायत्त संस्था इत्यादी आस्थापनेवरील कर्मचारी/अधिकारी हेतुपुरस्सर टाळाटाळ, कुचराई करतील त्यांच्याविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.बीसीसी-१०९३/६९७/१६-ब, दिनांक १२ जून,१९९५ अनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, वर उल्लेखिलेले आदेश त्यांच्या अधिपत्याखालील/प्रशासकीय नियंत्रणाखालील विभाग प्रमुखांना, कार्यालय प्रमुखांना, मंडळे/महामंडळे/महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपालिका /स्वायत्त संस्था/ अनुदानित संस्था इत्यादींच्या निदर्शनास आणण्यात यावेत.

याबाबत मंत्रालयीन विभागाने केलेली कार्यवाही/निर्गमित केलेले आदेश, सामान्य प्रशासन विभागास कळविण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

चारुशीला सोहोनी
प्रधान सचिव (सेवा)

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,.
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय,अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सर्व आयुक्त, महानगरपालिका,
आयुक्त, समाज कल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
आयुक्त, सेवायोजन, मुंबई,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती,

* पत्राने.